MHAH230005162019

**नियमीत दिवाणी दावा क्रमांक २१४/२०१९ मधील**

**निशाणी क्र.६१ वरील आदेश**

[०१] प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी नं. २३ चे वारस अभिलेखावर घेणेकामी झालेला विलंब माफ करण्यासाठी सादर केलेला आहे.

[०२] वादी यांचे असे कथन आहे की, प्रस्तुत दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. २३ शिवाजी गुलाब आढाव हे दि.०७/०२/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. प्रतिवादी क्र. २३ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी आवश्यक असलेली महत्वाची कागदपत्रे व योग्य ती माहिती वादीला वेळेत उपलब्ध झाली नाही. त्यामुळे वादीस प्रतिवादी क्र. २३ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी विलंब झालेला आहे. प्रकरण स्थावर मिळकतीसंबंधी असल्याने प्रतिवादी क्र. २३ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्याची विनंती केलेली आहे. सबब, सदरचा अर्ज.

[०३] प्रतिवादींनी अर्जाच्या पाठीमागील पानावर आपले म्हणणे दाखल करुन अर्जावर योग्य तो आदेश पारीत करावा अशी विनंती केलेली आहे. तसेच, मयत प्रतिवादी क्र. २३ यांच्या वारसांना नोटीस बजावणी होऊन देखील ते अर्जाच्या कामी हजर न राहिल्याने प्रस्तुत अर्ज त्याच्याविरुध्द एकतर्फा चालविण्यात आला.

[०४] अर्जाचे, त्यावरील म्हणण्याचे आणि अभिलेखाचे अवलोकन केले.

[०५] दोन्ही बाजुच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

[०६] प्रतिवादी क्र. २३ शिवाजी गुलाब आढाव हे दि.०७-०२-२०२४ रोजी मयत झालेले निशाणी क्र. ७१ वरील मृत्युप्रमाणपत्रावरुन दिसून येते. वादीच्या कथनानुसार मयत प्रतिवादी क्र. २३ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी आवश्यक असलेली महत्वाची कागदपत्रे व योग्य ती माहिती वादीला वेळेत उपलब्ध झाली नाही. त्यामुळे वादीस प्रतिवादी क्र. २३ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी विलंब झालेला आहे. यावरुन अर्जदाराच्या कथनांमध्ये तथ्य आढळून येते. हे खरे की वादीस अर्ज दाखल करण्यास ९० दिवसापेक्षा अधिक विलंब झालेला आहे. परंतू प्रतिवादी क. २३ च्या वारसांना दावा पुढे चालू ठेवण्याचा अधिकार आहे. अर्जदारांनी अर्जात नमूद केलेली कारणे व मयत प्रतिवादी क्र. २३ च्या मृत्यूची तारीख विचारात घेता, दावा गुणदोषावर निकाली काढण्यासाठी प्रतिवादी क्र. २३ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला

विलंब माफ करणे आवश्यक आहे. परंतू, त्यामुळे प्रस्तुतचे प्रकरण पुढे चालण्यासाठी झालेली दिरंगाई नजरेआड करता येणार नाही. सबब, अर्ज योग्य तो खर्च लादून मंजूर होण्यास पात्र ठरतो. त्यामुळे न्यायाचा हेतू साध्य करण्यासाठी मी पुढील आदेश पारीत करतो.

## आदेश

**(१)** अर्ज रक्कम रुपये १००/- च्या खर्चावर मंजुर करण्यात येत आहे.

**(२)** मयत प्रतिवादी क्र. २३ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात येतो.

**(३)** वादी यांनी पुढील तारखेपावेतो खर्चाची रक्कम रुपये १००/- विधी सेवा समितीकडे देण्यात यावी.

**(४)** प्रस्तुतच्या अर्जाचा खर्च वादी यांनी सोसावा.

PATIL PRAVIN VISHWAS

Digitally signed by PATIL PRAVIN VISHWAS
Date: 2026.01.23 18:00:26 +0530

(प्रविण वि. पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
श्रीगोंदा.

दिनांक:- २३-०१-२०२६.

**-: <u>प्र मा ण प त्र</u> :-**

प्रमाणीत करण्यात येते की, या पी. डी. एफ. फाईलमधील प्रत्येक शब्द हा मुळ आदेशाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : | एन.डी.दावत (श्रेणी-३) |
| न्यायालयाचे नांव | : | सह दिवाणी न्यायाधीश तथा<br>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, श्रीगोंदा,<br>ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर. |
| आदेश घोषित केल्याचा दिनांक | : | २३-०१-२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केल्याचा दिनांक | : | २३-०१-२०२६ |
| आदेश अपलोड दिनांक | : | २३-०१-२०२६ |